# स्तनपान सप्ताहात विविध कार्यक्रमातून जनजागृती

## तीन दिवसीय कार्यशाळेने समारोप

**नागपूर, दि. १० :** जागतिक स्तनपान सप्ताहच्या निमित्ताने १ ते ७ ऑगस्ट ह्या कालावधीत पोषाहार विभागाच्या वतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात आली. तीन दिवसीय कार्यशाळेने स्तनपान सप्ताहाचा समारोप करण्यात आला.

जनजागृती कार्यक्रमांतर्गत शहरी तसेच ग्रामीण भागातील अंगणवाडी, रुग्णालये, शाळा व महाविद्यालयात "स्तनपान व शिशुपोषण" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सादरीकरणाच्या माध्यमातून बाळाच्या वाढीच्या प्रक्रियेत मातेचे दूध कसे आवश्यक आणि पोषक आहे, याबाबत माहिती देण्यात आली. प्रत्यक्षिकांच्या माध्यमातून विषयावर प्रकाश टाकण्यात आला.

सप्ताहाच्या शेवटी राज्यातील समुपदेशकांसाठी पोषाहार विभाग कार्यालयात तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उदघाटन आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. संजय जयस्वाल यांच्या हस्ते झाले. यावेळी पोषाहार विभागाच्या वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. स्वाती घोडमारे, पोषाहार अधिकारी प्रिती खेरडे, कल्पना बरडे, अमिता पिल्लेवान उपस्थित होत्या.

तीन दिवसीय कार्यशाळेत समुपदेशकांना त्यांच्या कार्य आणि जबाबदारीविषयी अधिकाऱ्यानी मार्गदर्शन केले. आरोग्य उपसंचालक डॉ. संजय जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचा समारोप झाला. समारोपीय कार्यक्रमात त्यांनी 'स्तनपानाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले.

स्तनपान सप्ताहाच्या यशस्वी आयोजनाकरिता पोषाहार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.